परदेशातल्या प्रियजनांना राहते घराच्या चवीची ओढ,
DTDC करेल तुमच्या प्रियजनांची दिवाळी गोड...
वर्षातल्या सर्वात मोठ्या सणाला घरापासून लांब असण्याचं दुःख आम्ही समजू शकतो...
तुमचे प्रियजन घरी येऊ शकत नसले म्हणून काय झाले? तुमच्या हातचे फराळ तर त्यांच्यापर्यंत आम्ही नक्कीच पोहोचवू शकतो. तेही अगदी माफक दरात...
आपल्या अखंड सेवेत, DTDC कुरियर, कळंब.
: अधिक माहितीसाठी संपर्क :
मो.९४०४५११५१८/८९८३८९७०८९
DTDC एक्सप्रेस कुरियर सर्व्हिसेस, कळंब
छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल, सुनील मार्केट, गाळा नं.२७, कळंब ४१३५०७

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, मंगळवार, दि.१५ ऑक्टोबर २०२४
वर्ष : ०४, अंक : ६२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## बारचा व्यवसाय वाढवणाऱ्या मंत्री महोदयांना घरी बसवा : जयंत पाटील




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि,१४, पाटण :** राज्यात लोकसभा निवडणुकीपेक्षाही येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसाठी अतिशय पोषक वातावरण निर्माण झालं आहे. यातूनच महाविकास आघाडीची सत्ता येणार यासाठी कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही. पाटणची हुकूम शाही संपवत स्थानिक जनतेला सार्वत्रिक न्याय देण्यासाठी या आघाडी सरकारमध्ये पाटणचा आमदार म्हणून सत्यजितसिंह पाटणकर यांना तुम्ही निवडून द्या असे आवाहन करत सध्याच्या महायुतीच्या राज्यकर्त्यांना लाडकी बहीण, लाडक्या योजना महत्त्वाच्या नसून लाडकी खुर्ची महत्त्वाची असल्याने जनता त्यांना घरचा रस्ता दाखवणार हे निश्चित आहे. महाविकास आघाडीच्या येणाऱ्या सरकारमध्ये योजना, उपक्रम याहीपेक्षा अतिशय चांगल्याप्रकारे राबवल्या जातील अशी ग्वाही राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी दिली.

पाटण येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित शिवस्वराज्य यात्रेच्या महासभेत ते बोलत होते.

यावेळी राज्याचे माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर, खासदार अमोल कोल्हे, माजी पालकमंत्री आ. बाळासाहेब पाटील, राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, राष्ट्रवादीचे नेते सत्यजितसिंह पाटणकर, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, पंडित कांबळे, जिल्हाध्यक्ष सुनील माने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. जयंत पाटील पुढे म्हणाले, पाटण तालुक्यासह महाराष्ट्राने पाटणकर दादांचा मंत्रिपदाचा काळ अनुभवला मात्र सध्याचे मंत्री हे दहशत माजवत गैरप्रकाराला पाठबळ देत आहेत. पाटणला या मंत्रि महोदयांच्या काळात विकास नव्हे तर परमिट रूम, बियर बार वाढले आहेत. जनतेने यांना यासाठी आमदार मंत्री केलं होतं का? वेगळी वृत्ती असणाऱ्या या मंडळींनी आता राज्यच विकायला काढलं आहे याचा गांभीर्याने विचार करा. महाराष्ट्रातील जनता ही निश्चितच स्वाभिमानी आहे, पवार साहेबांचा लढाऊ बाणा, लढाऊ वृत्तीच्या पाठीशी उभा महाराष्ट्र उभा राहातो आहे. ज्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले त्याची पुनरावृत्ती आता पवार साहेबांच्या माध्यमातून रयतेचे राज्य आणण्यासाठी होत आहे. महायुती सरकारने राज्य अक्षरशः विकायला काढले असून योजनांच्या नावाखाली भरमसाठ पैशाची उधळण सुरू आहे. यांना जाणीव झाली आहे की वाट्टेल ते झालं तरी आता आपण पुन्हा सत्तेत येणार नाही त्यामुळे मनमानी कारभार करताना जे काही उधळता येईल ते उधळायचं काम ही मंडळी करत आहेत. वास्तविक राज्याच्या स्थापनेनंतर इतकं महाभयंकर भ्रष्टाचारी सरकार आजपर्यंत कधीही सत्येत आलं नव्हतं, मात्र हे बेजबाबदार लोक खुर्चीत बसल्यानंतर केवळ आणि केवळ भ्रष्टाचार मलिदा गँग, कमिशन, टक्केवारी यातच ही मंडळी गुरफटल्याने सर्वसामान्यांचं जगणं असह्य झालं आहे. आरोग्य, रस्ते, शेती पूर्णपणे कोलमडलेली आहे.

लोकसभा निवडणूकीत याच मंडळींनी मोठ्या प्रमाणावर पैशाचा वापर करूनही हाताला काहीच लागलं नाही. आता तर राज्यात महाविकास आघाडीच सरकार सत्तेवर येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. राज्यात महिलांवरील बलात्कार, बालकांवरील अत्याचार, महागाई वाढत असताना याच सरकारमधील एका माजीमंत्र्यांचा राजरोसपणे गोळ्या घालून खून होतो यापेक्षा दुर्दैव नाही. वाय प्लस सुरक्षा असतानाही जर यांचे लोकप्रतिनिधी सुरक्षित नसतील तर स्थानिक जनता कशी सुरक्षित राहणार याचाही विचार करायला पाहिजे. पाटण विधानसभा मतदारसंघात यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस सोबतच राष्ट्रीय कॉंग्रेस आणि प्रामुख्याने उद्धव ठाकरेंना मानणारा निष्ठावंत शिवसैनिक गद्दारांना धडा शिकवल्या शिवाय राहणार नाही. विद्यमान पालकमंत्र्यांना मंत्रीपद म्हणजे वाट्टेल ते करण्याची परवाना मिळाल्यासारखेच त्यांचे कामकाज सुरू असल्याने जनता यावेळी त्यांना घरी बसवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. तुम्ही सत्यजितसिंह पाटणकर यांना आमदार करा. महाविकास आघाडी सरकारमध्ये पाटण विधानसभा मतदारसंघातील प्रश्न हे सत्यजितसिंह पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली पूर्णपणे सोडवले जातील असे आश्वासनही शेवटी आ. जयंत पाटील यांनी दिले.

विक्रमसिंह पाटणकर म्हणाले टायगर अभी जिंदा है, जनतेने चांगल्या विचारांच्या पाठीशी आपली ताकद उभी करावी ज्या पद्धतीने वामनराव पै सांगतात तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार याच पद्धतीने आता मतदारसंघातील जनतेने आपल्या सर्वस्वासाठी डोळसपणे मतदान करावं. त्यांच्या पाठीशी स्वामी समर्थ म्हणतात त्याप्रमाणे भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे असंच कामकाज आपण करू . ज्या व्यक्तीने सर्वच पक्ष, नेत्यांना टांगा मारत गद्दारी करून केवळ सत्ता मिळवली ते जनतेलाही टांग मारतील हे लक्षात ठेवा. स्वातंत्र्य, भयमुक्त आणि सार्वजनिक विकास असा आदर्श मतदारसंघ करण्यासाठी सत्यजितसिंह पाटणकर यांना बहुमताने निवडून द्या.

सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, आता स्थानिक जनतेने ही निवडणूक हातात घेतली आहे. समोरच्यांनी सत्तेच्या जोरावर कितीही पैसा, दबाव टाकला तरीदेखील पाटणची स्वाभिमानी जनता आता परिवर्तन केल्याशिवाय राहणार नाही. लोकसभा निवडणुकीत आम्ही पाटण मधून महाविकास आघाडी उमेदवारांना मताधिक्य दिले, विधानसभा निवडणुकीतही त्याहीपेक्षा जादा मताधिक्य देत पवार साहेबांच्या पाठीमागे आपली ताकद निश्चितच निर्माण करु. परवाच पालकमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना आणून स्थानिक भूमिपूजनं करत विकासाचा खोटा कांगावा केला व स्थानिक जनतेच्या डोळ्यात धुळफेक केली. या गोष्टी स्थानिक जनतेच्या हिताच्या नसून केवळ मलिदा गँग, टक्केवारीसाठी असल्याने त्यांचा जनतेने पर्दाफाश केला आहे. काही बोल पण रेटून बोल अशी अवस्था सत्ताधाऱ्यांची झाली आहे. जर खरोखरच यांनी विकास केला आहे तर मग लोकांना बुरशी आलेले लाडू, साखर, पेढे, टी-शर्ट, पैसे वाटण्याची अथवा बुरशी आलेले लाडू महिंद धरणात टाकण्याची वेळ का आली याचं उत्तर त्यांनी द्यावे. ठेकेदारांना हाताशी धरून दारू, मटण, पैसा वाटून मतं विकत घेण्याची मानसिकता असलेल्या लोकांना आता कायमचं दूर ठेवा. आपल्या विचारांच्या सर्वांना एकत्रित घ्या विरोधकांमध्ये बेरजेचं, विचार पटवून द्या. युवा, जेष्ठ, महिला, नाराज यांच्याशी संवाद साधत बुथ कमिट्या आणि सर्वांनी एकत्रित येऊन आपल्या पाटण विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करूयात. यासाठी तुम्ही माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहून आशीर्वाद द्या असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी आमदार बाळासाहेब पाटील, महाराष्ट्र प्रदेश सामाजिक न्याय प्रदेशाध्यक्ष पंडित कांबळे आदी मान्यवरांची भाषणे झाली.

स्वागत पाटण दूध संघाचे चेअरमन सुभाषराव पवार, प्रास्ताविक तालुकाध्यक्ष राजाभाऊ शेलार तर आभार प्रदर्शन सचिन जाधव यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस आयोजित कला दिग्दर्शन कार्यक्रम सादर करण्यात आला. नव्याने नेमणुका झालेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आली तर अनेक गावातील राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास माजी शिक्षण सभापती राजेश पवार, पाटण अर्बन बँक चेअरमन बाळासाहेब राजेमहाडिक, खरेदी विक्री संघाचे चेअरमन ॲड. अविनाश जानुगडे, उद्योजक याज्ञसेन पाटणकर , संजीव चव्हाण, नगराध्यक्षा सौ. मंगल कांबळे, सौ. स्नेहल कदम जाधव, रेखाताई पाटील, शंकर शेडगे, गुरूदेव शेडगे, निवासराव पाटील आदी मान्यवर, राज्यासह जिल्हा व पाटण विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने तरुण वर्ग यावेळी उपस्थित होते.

## मुंबईत पुढील तीन ते चार तासांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** मुंबई आणि परिसरात मागील काही दिवसांपासून पाऊस कोसळत आहे. दरम्यान, पुढील तीन ते चार तासांत मुंबईसह ठाणे पालघर जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. यावेळी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि अधूनमधून मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. अरबी समुद्रातील कमी दाबाचे क्षेत्र महाराष्ट्राच्या किनाऱ्यालगत सक्रिय आहे. ही प्रणाली वायव्येकडे जाताना आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. परिणामी राज्यात पुढील दोन ते तीन दिवस पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पुढील तीन ते चार तासांत मुंबईत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. यावेळी ३०-४० किमी वेगाने वारे वाहणार आहेत. मुंबईत मागील सलग दोन दिवस पाऊस कोसळत आहे. यामुळे वातावरणातील गारवा वाढला आहे. तसेच कमाल तापमानात देखील घट झाली आहे. मागील काही दिवस तापमानात सातत्याने वाढ होत होती. मात्र, पावसामुळे दोन तीन दिवसांपासून तापमानात कमालीची घट झाली आहे. दिवसभर ढगाळ वातावरण आणि सायंकाळी पाऊस असे वातावरण सध्या मुंबईत दिसत आहे. दरम्यान, राज्यात सर्वदूर पावसाची शक्यता मंगळवारी देखील कायम आहे. कोकण आणि घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

दरम्यान, शहर आणि उपनगरांत सुरू असलेल्या पावसामुळे हवेचा दर्जाही सुधारला आहे. काही भागात सातत्याने हवेचा दर्जा वाईट असल्याची नोंद झाली होती. मात्र सोमवारी हवेचा दर्जा समाधानकारक होता. मुंबई आणि परिसरात मागील दोन दिवसांपासून कोसळलेल्या पावसामुळे मुंबईची हवा स्वच्छ झाली आहे. हवेचा दर्जा रविवारी समाधानकारक पातळीवर नोंदवला गेला. त्याचबरोबर सोमवारीही गुणवत्ता निर्देशांक समाधानकारक होता.

## राज्यशासनाकडून पथकर माफी, मनसेचा जल्लोष



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** मुंबईत प्रवेश करताना असणाऱ्या पाचही पथकर नाक्यावर हलक्या वाहनांचा पथकर राज्य शासनाने माफ केला आहे. त्याची अंमलबजावणी सोमवारी रात्री १२ वाजल्यापासून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या या निर्णयाचे स्वागत आज सकाळपासून वाशी आणि ऐरोली पथकर नाक्यावर मनसेकडून वाहन चालकांना पेढे वाटप करून होत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मुंबईमध्ये प्रवेश करताना लागणारे पथकर नाके वाशी, दहिसर, ऐरोली, मुलुंड आनंदनगर या ठिकाणी हलक्या वाहनांना पथकरमधून वगळले आहे. त्यामुळे रोज हजारो गाडी चालकांना त्याचा फायदा होणार आहे, तर कोट्यधी रुपयांचा फटका राज्य शासनाला बसणार आहे. पथकर रद्द करावा म्हणून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अनेक वर्षांपासून मागणी करीत अनेक आंदोलनेसुद्धा केली होती. त्यामुळे आजपासून सुरु असलेल्या हलक्या वाहनांना पथकर माफीचा जल्लोष मनसे कार्यकर्ते करीत आहेत. ऐरोली पथकर नाक्यावर मनसे शहर अध्यक्ष निलेश बाणखिले तर वाशी पथकर नाक्यावर मनसे प्रवक्ते गजानन काळे हे आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह पोहेचले, त्यांनी जल्लोष साजरा करीत राज ठाकरे यांच्या नावाच्या घोषणा दिल्या, तसेच पथकर कर्मचारी आणि हलक्या वाहनांचे चालक प्रवासी यांना पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

## उद्धव ठाकरेंच्या प्रकृतीविषयी आदित्य ठाकरेंची पोस्ट



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. १४, मुंबई :** शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आज रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मुंबईतील सर एच. एन. रिलायन्स रुग्णालयात ते गेले होते. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीविषयी शिवसैनिकांनी चिंता व्यक्त केली होती. परंतु, आदित्य ठाकरे यांनी त्यांच्या प्रकृतीविषयी आता माहिती दिली आहे. त्यांनी एक्सवर पोस्ट केली.

आदित्य ठाकरे एक्स या मायक्रोब्लॉगिंग साईटवर पोस्ट करत म्हणाले, आज सकाळी उद्धव ठाकरे यांची सर एचएन रिलायन्स रुग्णालयात पूर्व नियोजित तपासणी झाली. तुमच्या शुभेच्छांमुळे सर्व काही ठीक आहे. आणि ते कामावर परतण्यासाठी आणि लोकांची सेवा करण्यास पूर्णपणे तयार आहेत.

**तीन वर्षांपूर्वी मानेच्या दुखण्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती**

मानेच्या दुखण्यावरील उपचारांसाठी उद्धव ठाकरे यांच्यावर १२ नोव्हेंबर २०२१ रोजी एच. एन. रिलायन्स रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यांच्यावर सर्व्हायकल स्पाईन संबंधित शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर उद्धव ठाकरेंची फिजिओथेरेपी सुरू करण्यात आली. या दुखण्यातून सावरण्यासाठी त्यांना अनेक आठवडे लागले होते.

## बुलडाणा जिल्ह्यात खळबळ !! प्रेमप्रकरण भोवले...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, बुलडाणा :** तब्बल दोन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या इसमाचा अखेर सांगाडाच हाती लागला. त्याची क्रूरपणे हत्या करून मृतदेह शेताच्या बंधाऱ्यात पुरण्यात आल्याचे आढळून आले. हिवरखेड परिसरात हा धक्कादायक घटनाक्रम घडला असून यामुळे खामगाव तालुक्यासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अनैतिक संबंध कधीकधी जीवावर देखील बेतू शकतात आणि पोलिसांनी ठरवले तर ते सुतावरून स्वर्ग गाठू शकतात.

या घटनेची पार्श्वभूमी तितकीच धक्कादायक आहे. खामगाव तालुक्यातील हिवरखेड पोलीस ठाण्यात मागील १८०ऑक्टोबर २०२२ रोजी सविता नंदु धंदरे हिने आपला पती नंदू शीराम धंदरे ( राहणार गणेशपुर) हा बेपत्ता असल्याची फिर्याद दिली होती. प्रकरणी हिवरखेड पोलिसांनी बेपत्ता झाल्याची नोंद करून तपास सुरु केला होता. असे सापडले मारेकरी




मात्र बेपत्ता इसमाचा शोध लागत नसल्याने तपास थंड बस्त्यात पडला. मात्र नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी नव्याने तपास करण्याचे आदेश देऊन काही निर्देश, सूचना केल्या. तसेच अपर पोलीस अधिक्षक (खामगाव) अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी (खामगाव) विनोद ठाकरे यांनीही तपासात लक्ष घालून हिवरखेड पोलिसांना वेळोवेळी उपयुक्त सुचना दिल्या. तब्बल दोन वर्षांपासून बेपत्ता नंदु श्रीराम धंदरे राहणार गणेशपुर, तालुका खामगाव) यांचा नव्याने शोध घेण्यासाठी हिवरखेड पोलीस ठाण्याचे विशेष तपास पथक गठीत करण्यात आले.

यामध्ये सहायक पोलीस निरीक्षक कैलास चौधरी, पोलीस हवालदार विठ्ठल चव्हाण, नायक पोलीस जमादार प्रविण जाधव, पोलीस जमादार महेंद्र नारखेडे यांचा समावेश होता. तपासासाठी जय्यत पूर्वतयारी करण्यात आली नंदु धंदरे याचा मोबाईल, सर्व संशयीत लोकांचे मोबाईल क्रमाक, त्यांचे 'लोकेशन' व माहिती घेण्यात संकलित करण्यात आली. नंदु धंदरे याचे संभाव्य पैश्याचे, जमीनीचे व प्रेमसंबंधाची माहिती काढण्याकरीता गोपनिय खबरीदार नेमण्यात आले. एवढेच नव्हे तर नंदु धंदरे याचेबद्दल माहिती देण्या-यास दहा हजार रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले. गणेशपुर गावासह हिवरखेड पोलीस ठाणे व nbsp परीसरात फलक लावण्यात आले होते.

# संपादकीय




## हरियाणातील भाजपचा धडा!

हरियाणामधील पराभवाने काँग्रेस पक्ष हैराण झालेला आहे. आपण जिंकता-जिंकता अचानक हरलो कसे, हे त्यांना कळलेलेच नाही. खरे तर गेल्या दहा वर्षांमध्ये भाजपने निवडणुकांचे राजकारण कमालीचे बदलून टाकले आहे. आणि ते समजून न घेताच काँग्रेस निवडणुका लढवत आहे. हरियाणातील पराभवानंतर काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीमध्ये एकमेकांवर दोषारोप केले गेले. राहुल गांधी हे भूपेंद्र हुड्डा वगैरे नेत्यांवर प्रचंड वैतागलेले होते. काँग्रेसच्या नेत्यांना पक्षाच्या विजयापेक्षा स्वत:चे हितसंबंध महत्त्वाचे वाटतात. त्यामुळे काँग्रेसचा पराभव होतो, असा आरडाओरडा राहुल गांधींनी केला. जिंकणारी निवडणूक हरल्यामुळे राहुल गांधींनी वैफल्यग्रस्त होणे साहजिकच आहे. पण, काँग्रेसच काँग्रेसला हरवतो असे नेहमी म्हटले जाते. काँग्रेसमधील सुभेदार आपापली जहागीरदारी टिकवण्यासाठी पक्षाचा बळी देतात असे अनेकदा पाहायला मिळाले आहे. हरियाणामध्येही तसेच झाले असेल असे म्हणता येईल. काँग्रेसच्या समस्या हाताळण्याच्या पारंपरिक पद्धतीनुसार समिती नेमली जाणार आहे. त्यातून काही होणार नाही हे प्रत्येकाला माहीत आहे. संघटना महासचिव के. सी. वेणुगोपाल हे राहुल गांधींचे निष्ठावान असतील तर त्यांच्यावर कारवाई होईल का, याचे उत्तर नकारार्थीच असेल. काँग्रेसमध्ये कुठल्याच गोष्टी बदलत नसतात, काँग्रेसमध्ये शस्त्रक्रिया होत नाही, मलमपट्टी होते. हरियाणाबाबतही फारसे काही वेगळे होईल असे नव्हे! पण, इथे मुद्दा काँग्रेस कोणावर काय कारवाई करेल हा नाहीच. काँग्रेसला भाजपचे निवडणुकीचे राजकारण कळलेले नाही ही त्यांच्यासाठी चिंतेची बाब ठरू लागली आहे. काँग्रेसची निवडणूक लढवण्याची पद्धत कदाचित कालबाह्य झाली असे म्हणताही येऊ शकेल.

पूर्वीप्रमाणे जाहीरनामा, प्रचार, नेत्यांचे दौरे, कुठली तरी लाट या बाबी पक्षांना निवडणूक जिंकून देत नाहीत. काँग्रेसला कधीही न जमलेले निवडणुकीचे सूक्ष्म-व्यवस्थापन भाजप अत्यंत शिताफीने करू लागला आहे. खरे तर या प्रकारामध्ये भाजपने मास्टरी मिळवलेली आहे. हरियाणामध्ये जनमत सरकारविरोधी होते याची जाणीव भाजपला पहिल्यापासून होती. मोदींचा चेहरा फारसा उपयोगी पडणार नाही आणि कुठलीही लाटही नाही. मग मतदारसंघनिहाय रणनीती आखून काँग्रेसची घोडदौड रोखायला हवी, याची कल्पना भाजपला आली असावी. त्यानुसार भाजपने टप्प्या-टप्प्याने पावले टाकली असावीत असे निकालावरून तरी दिसते. भाजपच्या बुथस्तरावरील कार्यकर्त्यांशी अमित शहांसारखे केंद्रीय नेते सातत्याने संवाद का साधतात, हे काँग्रेसला कळले असते तर हरियाणामध्येच नव्हे देशभर पक्ष संघटना मजूबत करण्याचे महत्त्व काँग्रेसच्या लक्षात आले असते. लोकसभा निवडणुकीमध्ये हरियाणातील दहा जागांपैकी पाच जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या. राज्यातील प्रभावी जाट मतदारांसह दलित-मुस्लिमांनी काँग्रेसला मते दिली होती. हेच समीकरण विधानसभा निवडणुकीत कायम राहिले तर हरियाणात काँग्रेस प्रचंड बहुमताने सत्तेवर आला असता. जिंद, रोहतक वगैरे जाटप्रभावी पट्ट्यामध्ये जाटांची एकगठ्ठा मते काँग्रेसला मिळालीही. सिरसा आदी दलितांसाठी राखीव मतदारसंघांमध्ये काँग्रेसला विजय मिळाला, पण दलितांसाठी राखीव असलेल्या एकूण जागांपैकी निम्म्या जागा भाजपला मिळाल्या आहेत हे लक्षवेधी ठरते. म्हणजेच लोकसभेतील दलित एकीकरण कायम राहिले नाही. काही मतदारसंघांमध्ये दलित मायावती वा चंद्रशेखर आझाद यांच्या पक्षाकडे वळल्यामुळे दलित मतांमध्ये विभागणी झाली. जाट मतदारही राष्ट्रीय लोकदल, भाजप आणि काँग्रेसमध्ये विभागला गेला. दुसऱ्या बाजूला भाजपचा खंदा ओबीसी मतदार पक्षाबरोबरच राहिला. प्रभावी व प्रबळ असलेल्या एका जातीची दादागिरी ओबीसी-दलित समाज सहन करत नाही हे अनेकवेळा उत्तर प्रदेशसारख्या राज्यामध्ये दिसले आहे. त्याची पुनरावृत्ती हरियाणामध्ये झाली. जातीच्या समीकरणाचे डावपेच भाजपला अनुकूल ठरले.

# देवांचा प्रिय राजा : प्रियदर्शी सम्राट अशोक!




सम्राट अशोकाला अत्यंत हुशारीने आणि धूर्तपणे ब्राह्मणांनी भारतीय लोकांच्या मनातून विसरले आहे. बौद्ध धर्म म्हणजे 'समानता', स्वातंत्र्य, समाजातील 'बंधुत्व आणि न्याय' म्हणजेच मानवी कल्याणाची व्यवस्था नष्ट करण्यासाठी ब्राह्मणांनी अशोकाच्या आठवणी नष्ट करणे अत्यंत आवश्यक होते. या हेतूने त्यांनी अशोकाशी संबंधित दिवसांचे काल्पनिक राम उत्सवात रूपांतर केले. अशोकाने ज्या दिवशी धम्मदीक्षा घेतली, त्याच दिवशी विजयादशमीचे रूपांतर रामाच्या दसऱ्यात झाले आणि ब्राह्मणांनी सम्राट अशोकाच्या जन्म दिवसाचा दिवस राम जन्मदिवस म्हणून बदलला. हे दोन दिवस केवळ भारताच्याच नव्हे तर जगातील सर्व देशांच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे आहेत.. सम्राट अशोकाने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली नसती तर कदाचित आज जगात बौद्ध धर्माचे दर्शन झाले नसते. आणि त्यापलीकडे जगात समानता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय अस्तित्वात नाही, हे सांगणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

अशोक दस्सेरान्यू कलिंग युद्धात महान सम्राट अशोकाच्या विजयानंतर दहाव्या दिवशी याला अशोक विजयादशमी म्हणतात. याच दिवशी सम्राट अशोकाने बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. विजय दशमी हा बौद्ध धर्मीयांचा पवित्र सण आहे. ऐतिहासिक सत्य हे आहे की कलिंग युद्धानंतर महाराजा अशोकाने हिंसाचाराचा मार्ग सोडून बौद्ध धर्म स्वीकारण्याची घोषणा केली होती. बौद्ध झाल्यानंतर त्यांनी बौद्ध स्थळांना भेटी दिल्या. तथागत भगवान बुद्धांचे जीवन परिपूर्ण व्हावे आणि त्यांचे जीवन सुखमय व्हावे या हेतूने हजारो स्तूप बांधले जातात. शिलालेख, धम्म स्तंभ बांधले. सम्राट अशोकाच्या या धार्मिक परिवर्तनाने खूश होऊन देशातील जनतेने ती सर्व स्मारके सजवली आणि त्यावर दीपोत्सव साजरा केला. हा कार्यक्रम उत्साहात साजरा केला जातो. १० दिवस गेले, दहाव्या दिवशी सम्राट अशोकाने राजघराण्यासह आदरणीय भंते मोगिलिपुत्त तिश्याकडून धम्म दीक्षा घेतली. धम्माची दीक्षा घेतल्यानंतर सम्राट अशोकाने शपथ घेतली की आजपासून ते केवळ धर्मग्रंथांनीच नव्हे तर शांती आणि अहिंसेने सजीवांची मने जिंकतील. म्हणूनच संपूर्ण बौद्ध जग अशोक विजय दशमी म्हणून साजरा करते. पण बहुजनांचा हा महत्त्वाचा सण ब्राह्मणांनी काल्पनिक राम आणि रावणाचा विजय म्हणत काबीज केल्याचे बोलले जाते. जोपर्यंत दसऱ्याचा संबंध आहे, त्याच्याशी संबंधित वस्तुस्थिती अशी आहे की चंद्रगुप्त मौर्यापासून मौर्य साम्राज्याचा शेवटचा शासक बृहद्रथ मौर्यापर्यंत दहा सम्राट होते. शेवटचा सम्राट बृहद्रथ मौर्याची हत्या त्याच्या जनरल पुष्यमित्र शुंगाने केली आणि शुंग राजवंश स्थापन पुष्यमित्र हे शुंग ब्राह्मण होते. या दिवशी या समाजाने मोठा सण साजरा केला. त्या वर्षी अशोक विजयादशमीचा दिवस होता. ते अशोक शब्द काढून साजरा केला. या उत्सवात मौर्य राजवंश १० सम्राटांचे वेगळे पुतळे न बनवता एकच पुतळा बनवला आणि १० डोके बनवून ते जाळण्यात आले. २५०० वर्षाच्या सम्राट अशोकाच्या वारशाशी जोडणयासाठी म्हणून दि.१४ ऑक्टोबर १९५६मध्ये अशोक विजयादशमीच्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ५ लाख लोकांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.


सम्राट अशोकांची कार्ये खूप महत्त्वपूर्ण राहिलेली आहेत. अशोकाने बौद्ध धर्माची शिकवण देताना लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीला चालना दिली. शांततेच्या मार्गाने कुठलेही राज्य जास्त काळ टिकू शकेल यावर त्याचा विश्वास निर्माण झाला बौद्ध धर्माच्या प्रसाराला त्याने चालना दिले त्यासाठी शासकीय अधिकारी नेमले स्वतःच्या मुलांना त्याने धर्म प्रसारासाठी पाठवले धम्मचक्र परिवर्तन करणारा अशोक हा प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरला आहे इतिहासाला युगानुयुगे त्याची नोंद घ्यावी लागेल मानवी कल्याणासाठी पथक प्रयत्न करणारा प्रजा हीच दक्ष व प्रजा कल्याणकारी शासक म्हणून अनेक इतिहासकारांनी अशोकाच्या कार्याचा गौरव केलेला आहे

माधव कोंडविलकर आपले पुस्तक- देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी सम्राट अशोक मध्ये म्हणतात की, ''काही बाबतीत चक्रवर्ती सम्राट अशोकांची तुलना, अलेक्झांडर द ग्रेट, ऑगस्टस सीझर, चेंगीजखान, तैमूर, रशियाचा पहिला पीटर किंवा पहिला नेपोलियन यांच्याशी केली जाऊ शकते; पण अलेक्झांडरसारखा सम्राट् अशोक अति-महत्त्वाकांक्षी नव्हता. ऑगस्टस सीझरसारखा तो एक आदर्श शासनकर्ता होता; पण आपण हुकूमशहा म्हणून ओळखलं जावं असं जे सीझरला वाटायचं तसं अशोकाला कधीच वाटलं नाही. आपली तशी ओळख व्हावी अशी त्याची कधीच इच्छा नव्हती. अशोक एक सामर्थ्यवान सेनापती होता; पण आपल्या पराक्रमाबद्दल, विजयाबद्दल पहिला नेपोलियन जसा सदैव असंतुष्ट असायचा तसं अशोकाचा बाबतीत नव्हतं. प्रजाजनांनी आपल्यावर प्रेम करावं, असं त्याला मनापासून वाटत असे. चेंगीसखान, तैमूर आणि रशियाच्या पहिल्या पीटरने त्यांच्या प्रजेवर जशी दहशत बसवली होती, तशी दहशत सम्राट अशोकने कधीच बसवली नाही. मनाचा मोठेपणा किंवा उमदेपणा, मनातला शुद्ध भाव, स्वभावातला प्रामाणिकपणा, स्वतःच्या प्रतिष्ठेबद्दलची किंवा मानमरातबाबद्दलच्या स्पष्ट स्वच्छ कल्पना आणि मनातलं सर्वांबद्दलचं प्रेम या अशोकाच्या, इतरांपेक्षा वेगळेपणाने जाणवणाऱ्या वैशिष्ट्यांमुळे त्याला गौतम बुद्धांच्या किंवा येशू ख्रिस्ताच्या पंक्तीत नेऊन बसवले होते.''

!! सर्व बहुजन समाजबांधवांना अशोक विजया दशमीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**गडचिरोली, फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

## सम्राट दिलीप..



सुखावलेअसती दादा
तव फाळके पुरस्कार
एकमेवाद्वितीय सम्राट
युसूफ दिलीप कुमार

स्वप्न चित्रपट सृष्टीचे
सत्यात करी साकार
जगला हरेक भुमिका
दिधला अद्भूत आकार

असता भूमिका टुकार
त्यांचा सुस्पष्ट नकार
पैशा पलिकडे पाहिले
चोखंदळ हा कलाकार

रोमँटिक सीन आपले
मदन बाणी टण् कार
मोरपिस जणूं हळूवार
मन विणा करी झंकार

ट्रॅजेडीकिंग न तुजसम
काळजा असंख्य वार
धाय मोकलूनि रडलो
पाही सीन तो वारंवार

तव अभिनय नक्कल
प्रयास झाले चिक्कार
जमले नाही कुणाही
एकाहून एक भिक्कार

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# वाचन प्रेरणा दिन...



आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो.

देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन.

एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## लेप्टोस्पायरोसिस आजाराने कु.तेज येरूणकर याचा दुर्दैवी मृत्यू



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१४, जोगेश्वरी (मुंबई) :** मुंबईत चिंताजनक असा लेप्टोस्पायरोसिस या संसर्गजन्य आजाराने डोके वर काढले असून लेप्टोस्पायरोसिस या जीवघेण्या आजाराने नुकताच जोगेश्वरी (दत्तटेकडी) येथे राहणारा कु तेज चंद्रकांत येरूणकर या १३ वर्षीय मुलाचा अंधेरी येथील होली रुग्णालयात रविवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. दोन दिवसापूर्वी त्याला अंधेरी येथील होली रुग्णालयामध्ये अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

या घटनेने नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया उमटत असून सरकारने तसेच मुंबई म हानगरपालिकेने विविध विषाणू तसेच संसर्गजन्य साथीच्या रोगप्रतिबंधक उपाययोजना तातडीने कराव्यात अशी मागणी होत आहे.

लेप्टोस्पायरोसिस हा आजार प्रामुख्याने संसर्ग उंदीर तसेच वन्यप्राणी यांच्या मूत्रातून होत असल्याचे यातील तज्ञ डॉक्टर यांच्या संशोधनातून समोर येत असते, पावसाळ्यात हा आजार मोठ्या प्रमाणात बळावत असतो, डबक्यात जमा होणारे दूषित पाणी त्यात अशा संसर्ग प्राण्यांचा मूत्र मिश्रित झाल्यास या रोगाचा प्रसार माणसांमध्ये होण्याचा धोका असतो, थंडी भरून येणे,डोके दुखणे, स्नायु दुखणे ही प्रामुख्याने लेप्टोस्पायरोसिसची लक्षणे दिसून येतात.

## माजी आ.सुभाष भोईर यांच्या मागणीला यश



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १४, दिवा (ठाणे) :** दिव्यात माजी आमदार सुभाष भोईर यांच्या हस्ते ठाणे म हानगरपालिकेच्या माध्यमातून दिवा प्रभाग समिती अंतर्गत राधाबाई आपारमेंट अभुदय बँक पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे कामाचा भूमिपूजन सोहळा पार पडला. सदरचे काम राजेश कॅन्स्ट्रेशन सदर काम पूर्ण करणार आहेत. या प्रसंगी ठाकरे शिवसेनेचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते तसेच महिला पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होत्या.

## हनुमंत जाधव यांची शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात कार्यालयीन अधीक्षक पदी नियुक्ती



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१४, धाराशिव :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय हे धाराशिव जिल्ह्यातील मानांकित महाविद्यालयाच्या गणनेमध्ये आहे. ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा या संस्थेचे संस्थापक कै.ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांनी या महाविद्यालयाची स्थापना सन १९६९ मध्ये केली. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. हजारो विद्यार्थी या महाविद्यालयांमधून उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडले ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष अनिल मोहेकर संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर (दादा) संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.आबासाहेब बारकुल, संस्थेचे सहसचिव गव्हाणे भागवतराव, कोषाध्यक्ष प्रा.अंकुशराव पाटील संस्थेचे संचालक प्रा.डॉ. संजय कांबळे, प्रा.डॉ.डी.एस.जाधव, शिंदे नानासाहेब, मडके तात्यासाहेब, पवार विलास, प्रा.मडके वसंत व सर्व संस्थेच्या संचालकांनी हनुमंत अच्युतराव जाधव यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## चोराखळी येथे दसरा मेळाव्या दरम्यान स्मारकाचे व सभागृहाचे लोकार्पण



**अक्षरा : संगीता वनकळस**

**दि.१४, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यातून तथा कळंब तालुक्यातुन सर्व ओबीसी बांधव सर्वच जाती धर्माचे लोक या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे, या दसऱ्या पासून चोराखळी येथे. दसरा मेळावा सुरुवात करणे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, यांच्या स्मारकाचे आणि सभागृहाचे लोकार्पण करणे असा होता. जे स्मारक डॉ.स्नेहा सोनकाटे. यांच्या पुढाकारातून उभे राहिले होते. व तीन वर्ष झाली काम पूर्ण होऊन पण काही गलिच्छ विचार सरणी असणाऱ्या पुढऱ्यांनी तो लोकार्पण सोहळा अडून धरला होता. तोच कार्यक्रम सर्व ओबीसी बांधवाना व सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन संपन्न झाला.

# सगे सोयरे अधिसूचना रद्द करा ; कुणबी समाज आक्रमक

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१४, मुंबई :** मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाच्या दबावतंत्राला बळी पडून मराठा समाजाच्या ओबीसीकरणासाठी मराठा समाजाच्या सगेसोयऱ्यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची अधिसूचना अंतिम करण्याच्या शासनाच्या निर्णयाविरोधात आज सोमवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न तालुका शाखांच्या वतीने कोकण सह मुंबईत तीव्र आंदोलन करण्यात आले.

**कुणबी समाज शाखा विरार, आणि रोहा मुबंई वतीने वसई तहसीलदार यांना निवेदन**

सगे सोयरे अधिसूचना रद्द करा. मराठ्यांना कुणबी दाखले देवू नका. ओबीसींची जातनिहाय जनगणना करा. अशा घोषणा देत कुणबी समाजाच्या वतीने वसई तहसीलदार अविनाश कोष्टी यांना निवेदन देण्यात आले.

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई विभागीय शाखा नेतृत्वात आज सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४






रोजी सकाळी ११ वाजता संघाचे सचिव कृष्णा वणे, रोहा शाखा अध्यक्ष शरद गंभे, खजिनदार दिलीप कदम, माजी अध्यक्ष माधव आग्री, माजी उपाध्यक्ष हरेश पवार, प्रबोधन सम्राट शिक्षक दीपक भरणकर, विरार कुणबी विरारचे अध्यक्ष किशोर भेरे, सचिव- एकनाथ डिंगणकर, युवा अध्यक्ष अविनाश पाचकले, अनंत फिलसे, कुणबी महिलां मंडळ सचिव कातकर ताई आणि सर्व महिला पदाधिकारी आणि विभागीय शाखा विरार चे पदाधिकारी आणि कुणबी युवा शिलेदार यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. आरक्षणाची वाताहत लावणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात आक्रोश करण्यात आला.

संघाचे सचिव कृष्णा वणे यांनी वसई तहसीलदार येथे अविनाश कोष्टी यांच्या दालनात स्वता समज दिली की जरांगे पाटील यांच्या दबावाला बळी न पडता त्यांच्या सगे, सोयरे, गणं, गोत्र,यांना कुणबी दाखले देऊ नका. असे सरकार जी.आर (GR) काढून कुणब्यांची मोठी फसवणूक करणार असे दिसून येत आहे.म्हणुन वेळीच आपण राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ओबीसी मंत्री, यांना ठाम पणे सांगा .जर जी.आर (GR) काढला तर मात्र कुणब्यांना आरपारची रस्त्यावरची लढाई लढायला भाग पाडू नका. कुणबी मुलांचे हाल करू नका.मराठा समाज मोठ्या प्रमाणात कुणब्यांच्या जातीमध्ये घुसखोरी करतो आहे त्यांना त्वरित थांबवा असे संघाचे सचिव कृष्णा वणे यांनी तहसीलदार यांना सांगितले.

# आजच्या घडीला शेती हाच शाश्वत व्यवसाय ; उपसभापती प्रदीप वाघ याचे प्रतिपादन

**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.१४, मोखाडा :** आपण कोरोना मधील परिस्थिती बघितली मोठं मोठे उद्योग, नोकरदार सर्व ठप्प झाले अखेर सगळ्यांना मातीचाच आधार घ्यावा लागला मात्र शेतकरी खऱ्या अर्थाने आपले काम करीत होता, यामुळे आजच्या घडीला शाश्वत व्यवसाय हा शेतीच आहे. शेती हा बापाचा धंदा आहे पापाचा नाही असे प्रतिपादन म ोखाडा पंचायत समितीचे उपसभापती प्रदीप वाघ यांनी केले,१५वा वित्त आयोगाच्या निधीतून वाघ यांनी शेतकरी प्रशिक्षण मेळावा घेवून एक नवीन आदर्श देखील निर्माण केला आहे यावेळी रेशीम उद्योग अधिकारी तसेच कृषी मंडळ अधिकारी आणि शेतकरी मोठ्या प्माणावर उपस्थित होते.

यावेळी वाघ यांनी पुढे सांगितले की आज घडीला आपली



पारंपारीक शेतीचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आह नागली उडीद या पिकांचे तर अतोनात नुकसान झाले आहे.

यामुळे आता आपल्याला या शेतीत नवनवे प्रयोग करणे गरजेचे असून त्यासाठी ही रेशीम शेती देखील एक वरदान आहे. तसेच शेती हा माझा आवडता विषय असून दगड सिमेंट रेती पेक्षा या मातीवर माझे जास्त प्रेम आहे असे सांगत ठेकेदारी करणाऱ्या लोकप्रतिनिधींना टोला देखील लगावला.यावेळी खोडाळा विभागातील गोमाघर सूर्यमाळ येथील शेतकऱ्यांनी रेशीम लागवड केल्याने येथील शेतकऱ्यासाठी त्या बाबत अधिक माहिती मिळावी यासाठी हे प्रशिक्षण मेळावा घेण्यात आला याचे तुती लागवड कशी करावी याचा फायदा त्यासाठी लागणारा खर्च याबाबत रेशीम उद्योग अधिकारी यांनी माहिती दिली. तर मंडळ अधिकारी सोळूखे यांनी शेती व्यवसायात शेतकरी राजा आहे यामुळे त्या पद्धतीने शेती करणे आवश्यक असून विभागवार माती त्याची खोली यामध्ये फरक असतो तसेच पाणी उपलब्धता देखील महत्त्वाचा विषय असून त्यानुसार पिके घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी पत्रकार हनिफ शेख यांनी कोणत्याही कामात संयम अतिशय महत्त्वाचा असून नुसते अनुदान किंवा कागद रंगवण्यासाठी नको तर खऱ्या अर्थाने शेती करा याचे मोठे फायदे आहे असे सांगितले जर तुम्हीच शेती करणार नसाल तर भावी पिढी कशी शेती करेल यामुळे त्यांच्या समोर तुम्हाला एक आदर्श तयार करावा लागेल तेंव्हाच ही शेती टिकेल असे त्यांनी सांगितले यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रम ास गोमघर सरपंच सुलोचना गारे, सूर्यमाळ सरपंच गीता गवारी आरोहण संस्थेचे नितेश मुकणे, पत्रकार ज्ञानेश्वर पालवे,वामन दिघा, नामदेव ठोंबरे आदी उपस्थित होते.

# खेळ पैठणीचा या कार्यक्रमाच्या मानाची पैठणी विजेत्या ठरल्या आरती भोईर

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, शिळफाटा (ठाणे) :** ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी जय भवानी तरुण मित्र मंडळ शिळगाव ता.जि. ठाणे तर्फे दुपारी १२ वाजता दुर्गा मातेची स्थापना मंडळाचे सदस्य वल्लभ मधुकर पाटील आणि त्यांच्या पत्नी मिलन पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत दुर्गा मातेची पूजा अर्चना आरती करण्यात आली.

या मंडळाची स्थापना १९९० साली झाली. या मंडळाला ३५ वर्षे पूर्ण झाली आहेत. हे मंडळ स्थापन करण्यासाठी शिळगावातील ज्या व्यक्तीने मोठं योगदान दिले आहेत ते आहेत स्वर्गीय धोंडू मारुती आलिमकर व स्वाध्याय परिवार तसेच या सार्वजनिक उत्सवासाठी ज्यांनी जागा दिली ते म्हणजे स्वर्गीय चाहू लक्ष्मण आलिमकर, २७ वर्ष मंडळाच्या अध्यक्ष पदावर असताना ज्यांनी नीट नियमाने काम केले ते स्वर्गीय रामचंद्र कृष्ण आलिमकर, तसेच जे दोन सदस्य असे होऊन गेले की, त्यांनी आहोरात्र नवरात्र उत्सवासाठी झटले ते म्हणजे स्वर्गीय शांताराम गजानन आलिमकर व स्वर्गीय अनंता कृष्णा भोईर, या मंडळासाठी नेहमी सहकार्य करणारे त्यावेळी ग्रामस्थ सखाराम रामा




पाटील, शांताराम आलिमकर, रमेश आलिमकर, सिताराम आलिमकर, महेंद्र आलिमकर, कम ळाकर आलिमकर, मोरेश्वर आलिमकर, रघुनाथ भोईर, रामचंद्र भोईर, रघुनाथ आलिमकर, हरिचंद्र आलिमकर, बळीराम भोईर, स्वर्गीय परशुराम भोईर, अभिमन्यू भोईर, मारुती भोईर, सखाराम बुधाजी आलिमकर, नरेश आलिमकर, परशुराम आलिमकर, बबन म्हात्रे, मधुकर आलिमकर, स्वर्गीय मधुकर भोईर, स्वर्गीय राजाराम आलिम कर, रमेश भोईर, अनिल पाटील, आत्माराम भोईर, बालाजी पाटील, धनेश काठे, स्वर्गीय पांडुरंग म्हात्रे, रतन म्हात्रे, शनिवार वास्कर,भगवान वास्कर, रमेश काठे, सज्जन पाटील, बबन भोईर, स्वर्गीय नकुल भोईर, स्वर्गीय गौतम पावशे, मंडळ स्थापन करण्यासाठी विशेष सहकारी करणारी ही सर्व ग्रामस्थ होते तसेच शिळगावातील ठाणे म हानगरपालिकेमध्ये शाला क्रमांक ८१ मध्ये शिक्षक असलेले स्वर्गीय तुकाराम राहू बिदले गुरुजी यांचे सुद्धा खूप मोठं योगदान होते त्यावेळी. स्वर्गीय रामचंद्र आलिमकर यांच्यानंतर दुसरे अध्यक्ष झाले ते रोहिदास आलिमकर, उपाध्यक्ष स्वप्निल पावशे, उपाध्यक्ष साईनाथ भोईर, सचिव प्रशांत भोईर, उपसचिव जयेश दातिलकर, खजिनदार शिवा आलिमकर, सल्लागार संतोष भोईर, कार्यकारी सदस्य सुंदर आलिमकर, अनिल भोईर, महेश काठे, वल्लभ पाटील, कुणाल आलिमकर, रितेश पाटील, नितेश पाटील, वैभव आलिमकर, प्रथमेश आलिमकर, हे सर्वजण दहा दिवस कार्य व्यवस्थित पडावे म्हणून दिवस-रात्र मेहनत घेत असतात.

तसेच त्यांना सहकार्य करत असतात अशोक काठे, निलेश आलिमकर, विशाल आलिमकर, दिनेश काठे, प्रेमनाथ आलिमकर, दिलीप आलिम कर, मनोज काठे, सखाराम भोईर, लालचंद्र आलिमकर, जयेंद्र भोईर, अनंता म्हात्रे, राघो भोईर, विनोद भोईर, आशिष भोईर, सचिन आलिमकर, अनिल साळवी, तेजस पाटील, योगेश आलिमकर हे सर्वजण मंडळाला सहकार्य करत असतात.

# ठाणे खाडी पूल-३ च्या उत्तर वाहिनीचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, वाशी (नवी मुंबई) :** राज्याच्या कुठल्याही भागात गेलात तर सध्या सर्वत्र विविध प्रकल्प, विकास कामे सुरू आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ जवळपास दोन लाख कोटींचे प्रकल्प राबवित आहे. पायाभूत सुविधा प्रकल्प निर्मितीत महाराष्ट्र राज्य देशात क्रमांक एकवर असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वाशी येथे केले.

सायन-पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्र.३ च्या मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या उत्तर वाहिनी मार्गिकेचे उद्घाटन व रेवस (रायगड) ते रेडी (सिंधुदूर्ग) या सागरी महामार्गावरील सात खाडी पूलांच्या कामांचे भूमीपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज वाशी येथे संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, माजी खासदार राहुल शेवाळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर-पाटणकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, मुख्य अभियंता राजेश निघोट, मुख्य अभियंता एस.के. सुरवसे यांच्यासह इतर मान्यवरही उपस्थित होते. पनवेल ते सिंधुदूर्ग दरम्यानच्या कोकण ग्रीन फिल्ड एक्सप्रेस वे चे काम



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांने हाती घेतले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते कोकण हे अंतर अवघ्या पाच तासात पार करता येईल.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना दादाजी भुसे म्हणाले की, ठाणे खाडी पूल क्र.३ ची उत्तर वाहिनी तीन पदरी पूलामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास निश्चितच यश येईल, पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या दक्षिण वाहिनीच्या पूलाचे कामही अत्यंत वेगाने प्रगतीपथावर आहे.

या उद्घाटन कार्यक्रमाच्या शेवटी ठाणे खाडी पूलाची मुंबईहून पुण्याला जाणारी उत्तर वाहिनी वाहतुकीसाठी सोमवार, दि.१४ ऑक्टोबर पासून सुरु होणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थिकलशाकडे मंत्र्यांनी फिरवली पाठ

## बौद्ध समाजात नाराजीची लाट; निवृत्ती सांगवे यांची तीव्र नाराजी

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१४, उदगीर (लातुर) :** ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने उदगीर विधानसभा मतदारसंघाचे इच्छुक उमेदवार इंजी.विश्वजीत अनिलकुमार गायकवाड यांनी उदगीर परिसरातील बौद्ध समाजाच्या भावनांची कदर करत उदगीर येथे बाबासाहेबांना मानवंदना देता यावी.

यासाठी नागपूर येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अस्थिकलशाची मिरवणूक काढत शहरांमध्ये विश्वशांती बौद्ध विहार येथे मानवंदनेचा कार्यक्रम ठेवला होता. कर्म धर्म संयोगाने याप्रसंगी बौद्धविहार येथे विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे हे देखील उपस्थित होते.

मात्र त्यांनी ही मिरवणूक बुद्ध विहारा जवळ येताच तेथून काढता पाय घेतला आणि अस्थिकलशाचे दर्शनही घेतले नाही. याबद्दल बौद्ध समाजामध्ये प्रचंड नाराजीची लाट पसरल्याची चर्चा चालू आहे. याबद्दल राष्ट्रीय दलित अधिकार मंचचे प्रदेशाध्यक्ष, भारतीय दलित पँथर चे प्रदेश उपाध्यक्ष तथा उदगीर नगरपालिकेचे माजी सभापती निवृत्तीराव सांगवे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. उदगीर शहरामधील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा नव्याने उभारण्यात येत



असल्याने त्या ठिकाणी जुना पुतळा होता, तो काढण्यात आला आहे, आणि आता त्या जागेवर काहीही नसल्यामुळे उदगीर परिसरातील नागरिक धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या दिवशी मानवंदना कुठे द्यावी?

अशा विवंचनेत असतानाच काही भीमसैनिकांनी या संदर्भात इंजि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड यांच्यासोबत चर्चा करून अस्थिकलश आणावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या लोक भावनेची कदर करत धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्थीकलश उदगीरमध्ये आणला. यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे नागरिकांना अस्थिकलशाचे दर्शन घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली. उदगीर शहरातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौकापासून अस्थिकलशाची मिरवणूक काढण्यात आली.

याप्रसंगी जगभरातील भिकू संघाचे नामांकित अध्यक्ष यामध्ये श्रीलंका, थायलंड, व्हिएतनाम, जापान, कंबोडिया, थायलंड, भारत या ठिकाणच्या भंतेजिंनी उपस्थिती लावली होती. त्यामुळे या कार्यक्रमांमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले होते.

सकाळी १० ते साडेबारा वाजेपर्यंत अस्थिकलशाची मिरवणूक शहरातील मुख्य रस्त्यावरून निघाली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे अभिवादन केले. त्यानंतर महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याला अभिवादन केले. तसेच महापुरुषांना अभिवादन केल्यानंतर साडेबारा वाजता विश्वशांती बौद्ध विहार येथे देशभरातून आलेल्या भिकू संघाचे भोजनदानचा कार्यक्रम झाला. त्यानंतर देश विदेशातील भिकू संघाचे स्वागत व धम्मदानाचा कार्यक्रम घेण्यात आला. एका बाजूला बौद्ध समाजामध्ये आणि भीमसैनिकांमध्ये या कार्यक्रमामुळे नवचैतन्य निर्माण झाले आहे.

मात्र याच दरम्यान केवळ राजकीय हेतू डोळ्यासमोर ठेवून या भागाचे प्रतिनिधी असताना देखील आणि बौद्ध विहारात उपस्थित असताना देखील अस्थिकलशाचे दर्शन घेण्याचे मंत्री महोदयांनी टाळल्याबद्दल भीमसैनिकांमध्ये प्रचंड नाराजीची लाट पसरली आहे. वास्तविक पाहता आयोजक कोणीही असला तरीही जगभर ज्या महामानवाला मानवंदना दिली जात होती. त्या महामानवाच्या अस्थिकलशाकडे पाठ फिरवणे कितपत योग्य आहे? असाही प्रश्न आता उपस्थित केला जातो आहे. प्रचंड जनसमुदायाला जगभरातील भंतेजींनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी भिकू संघाच्या वतीने बौद्ध उपासक, उपासिका यांना बौद्ध धम्माचे तत्व आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा या मानवी जीवनामध्ये सुख समृद्धी आणू शकतात. बौद्ध धम्म हा शांतीचे प्रतीक आहे.

जगाला आता युद्ध नको बुद्ध हवा, हा संदेश आवडू लागला आहे. अशा अर्थाचे मार्गदर्शन केले. बौद्ध धम्माच्या आचरण केल्यास जीवनामध्ये शांती प्राप्त होऊ शकते, असे सांगितले.

इंजि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाउंडेशनच्या वतीने भव्य दिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल उदगीर, जळकोट, देवनी, चाकूर, अहमदपूर परिसरातील जनतेकडून अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच अस्थी कलशामुळे यावर्षी परिसरातील जनतेला विश्वभूषण भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देता आली. अशा पद्धतीच्या भावना नागरिकांमधून व्यक्त केल्या जात आहेत.

# थोडक्यात

## ठाणे खाडी पूल-३ च्या उत्तर वाहिनीचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, वाशी (नवी मुंबई) :** राज्याच्या कुठल्याही भागात गेलात तर सध्या सर्वत्र विविध प्रकल्प, विकास कामे सुरू आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ जवळपास २ लाख कोटींचे प्रकल्प राबवित आहे. पायाभूत सुविधा प्रकल्प निर्मितीत महाराष्ट्र राज्य देशात क्रमांक एकवर असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वाशी येथे केले. सायन-पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्र.३ च्या मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या उत्तर वाहिनी मार्गिकेचे उद्धाटन व रेवस (रायगड) ते रेडी (सिंधुदुर्ग) या सागरी महामार्गावरील सात खाडी पूलांच्या कामांचे भूमीपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज वाशी येथे संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, माजी खासदार राहुल शेवाळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर-पाटणकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.अनिलकुमार गायकवाड, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, मुख्य अभियंता राजेश निघोट, मुख्य अभियंता एस.के. सुरवसे यांच्यासह इतर मान्यवर ही उपस्थित होते.

पनवेल ते सिंधुदुर्ग दरम्यानच्या कोकण ग्रीन फिल्ड एक्सप्रेस वे चे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांने हाती घेतले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते कोकण हे अंतर अवघ्या पाच तासात पार करता येईल. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना दादाजी भुसे म्हणाले की, ठाणे खाडी पूल क्र.३ ची उत्तर वाहिनी तीन पदरी पूलामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास निश्चितच यश येईल, पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या दक्षिण वाहिनी च्या पूलाचे काम ही अत्यंत वेगाने प्रगतीपथावर आहे. या उद्धाटन कार्यक्रमाच्या शेवटी ठाणे खाडी पूलाची मुंबईहून पुण्याला जाणारी उत्तर वाहिनी वाहतुकीसाठी सोमवार, दि.१४ ऑक्टोबर पासून सुरु होणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

## भाजपाचे प्रा.येरडलावार यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश

**अक्षराज : कैलास राठोड**




**दि.१४, किनवट (नांदेड) :** विधानसभा निवडणूकी पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदपवार पक्षाचे किनवट येथे एन.के. गार्डन येथे पक्ष प्रवेश सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री सुर्यकांताताई पाटील, जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, महिला जिल्हाध्यक्षा प्रांजली रावनगावकर, प्रा.जांबरूणकर, आमदार प्रदिप नाईक आदींची उपस्थिती होती. या पक्षप्रवेश सोहळा कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे माजी तालूका सरचिटणीस कृषी उत्पन्न बाजार समिती माहूरचे संचालक प्रा.पुरुषोत्तम मुरारी येरडलावार यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यासह आमदार प्रदीप नाईक यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँगेस शरद पवार पक्षात जाहिर प्रवेश केले. राजकीय क्षेत्राबरोबरच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये सतत ते सक्रिय राहतात. त्यांच्यासोबत मोठा मित्र परिवार आहे. भाजपाचे नेते प्रदेश कार्यकारीणी सदस्य डॉ.अशोक पाटील सुर्यवंशी यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती.भारतीय जनता पार्टी किनवट विधानसभेत मोठ्या प्रमाणात गटबाजी असून या गटबाजीमुळे सच्चा कार्यकर्त्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे आपण पक्ष प्रवेश केला असल्याचे ते म्हणाले. त्यांच्यासोबत मन्नेरवारलू समाजाचे सेवा निवृत्त वनक्षेत्रपाल अधिकारी आडेलू कुंभरवाड, सहकार आघाडी भाजपा माहूरचे माजी तालुका अध्यक्ष माणिकराव पाटील, चेतन क-हाळे पाटील भाजपा शक्तीकेंद्र प्रमुख ,भाजपा अल्पसंख्याक आघाडीचे माजी तालूका उपाध्यक्ष हजीज भाई, सारखणी येथील सामाजिक कार्यकर्ते ब्रम्हा हनवते, वसंतराव कदम, आदींनी पक्ष प्रवेश केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माहूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दत्तराव मोहिते यांनी केले.

## सोलापूर ते तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग ३ दिवस राहणार बंद

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१४, धाराशिव :** दिनांक १६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमा असल्याने तुळजापूरकडे पायी जाणाऱ्या भाविकांना त्रास होऊ नये. यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर रात्रीपासून ते दिनांक १७ ऑक्टोबर पर्यंत सोलापूर ते तुळजापूर राष्ट्रीय राजमार्ग वाहनांसाठी बंद ठेवण्यात आला आहे. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी इतर राज्यातील तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण पायी तुळजापूरला जाऊन भवानी मातेचे दर्शन घेतात. दि १६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमा असल्याने लाखोंच्या संख्येने भाविक भवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूरला पायी चालत जातात. प्रशासनाच्या वतीने सोलापूर ते तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गावरील सर्व वाहने बंद करून रस्ता बंद करण्यात येणार असल्याचे कळवण्यात आले आहे. पौर्णिमा यात्रेच्या कालावधीत फक्त पोलिस वाहने, अत्यावश्यक सेवेची वाहने व पोलीस प्रशासन ज्यांना परवानगी देतील अशीच वाहने या ३ दिवसात रस्त्यावर सोडली जातील. दि १४ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर पर्यंत हा राष्ट्रीय राजमार्ग वाहनांसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

## टोलमाफीपासून धारावी पुनर्विकासापर्यंत शिंदे सरकारचे १९ मोठे निर्णय

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१४, कल्याण (ठाणे) :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने आज झालेल्या बैठकीत मोठे आणि निर्णायक निर्णय घेतले. ५ टोल नाक्यांवर हलक्या प्रवासी वाहनांसाठी टोलमाफी सह धारावी पुनर्विकासासाठी १२५ एकर जागा देण्याचे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. टोलमाफीचा निर्णय आज रात्री १२ वाजल्यापासून लागू होणार आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी उद्या आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असल्याने आजची मंत्रिमंडळ बैठक विशेष महत्त्वाची ठरली.

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही शिंदे सरकारची शेवटची बैठक असू शकते. त्यामुळे सरकारने या बैठकीत एकूण १९ मोठ्या घोषणा करून महत्त्वपूर्ण प्रकल्पांना मंजुरी दिली. धारावी पुनर्विकासासाठी देवनार डम्पिंग ग्राउंडची १२५ एकर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर घेतलेल्या या घोषणांमुळे सरकारची रणनीती आणि निवडणूक तयारीवर लक्ष केंद्रीत झाले आहे.

# माजी आमदार उषाताई दराडे रिंगणात..?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, केज (बीड) :** बीड विधानसभा निवडणुकीसाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नेत्या अँड उषाताई दराडे यांनी देखील पक्षाकडे अधिकृत तिकीट मागितले आहे.

नुकत्याच झालेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीमध्ये अँड उषाताई दराडे यांनी पक्षप्रमुख शरदचंद्र पवार यांच्यासमोर आपली बाजू कणखरपणे मांडली. त्यामुळे आता बीड विधानसभा उमेदवारी बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये रंगत वाढणार हे नक्की.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरदचंद्र पवार यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी खऱ्या अर्थाने सर्वप्रथम ठोस पावले उचलली. त्यांनी शासन, प्रशासन, उद्योग व्यवसाय विविध क्षेत्रांमध्ये महिलांना देखील सन्मानाची संधी आणि वागणूक दिली.

त्यामुळेच बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे टाकळी सारख्या ग्रामीण खेड्यात जन्मलेल्या आणि मार्क्सवादी काँग्रेस पक्षातून जडणघडण झालेली असताना काँग्रेस पक्षातून पुढे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांना प्रवेश देऊन शरदचंद्र पवार यांनी सन्मानाची पदे दिली. अँड उषाताई दराडे या उच्चशिक्षित बीएससी एलएलबी विधीज्ञ असून त्यांनी जिल्हा परिषद सदस्य ते जिल्हा परिषदचे अध्यक्ष पद देखील यशस्वीपणे सांभाळले होते. त्यांच्यातील नेतृत्व गुण आणि कार्यतत्परता लक्षात घेता



पवार यांनी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीचे प्रदेशाध्यक्ष पद देऊन राज्यांमध्ये त्यांचे नेतृत्व उभे केले.

एवढेच नव्हे तर त्यांना आमदारांच्या निवडीतून विधान परिषदेवर आमदार म्हणून सदस्य देखील केले. आपल्या विधान परिषद सदस्याच्या काळात ताईंनी उत्कृष्ट वक्ता म्हणून राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा पुरस्कार देखील संसदेत पटकावला होता. त्यांनी मराठवाडा विकास आंदोलनात सहभाग घेतला.

मराठवाडा नामविस्तार लढ्यामध्ये कारावास भोगला. आणीबाणीमध्ये त्यांना अटक झाली होती. त्यांनी श्रमिक महिला संघाच्या राज्यप्रमुख पदाची देखील जबाबदारी सांभाळली होती. आपल्या राजकीय, सामाजिक पटलावर त्यांनी स्वतःची एक वेगळी छबी निर्माण करण्यात यश मिळवले. बदलत्या राजकीय परिस्थितीत त्यांनी कायम शरचंद्र पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पक्षनिष्ठ आणि नेतृत्व निष्ठावंत म्हणून प्रामाणिकपणे कार्यकर्त्याची जबाबदारी पार पाडली.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मराठा ओबीसी असा संघर्ष टोकाचा गेलेला असताना सुद्धा त्यांनी स्वतः ओबीसी असताना सुद्धा पक्षाचे आदेश हेच अंतिम आदेश मान्य करून ओबीसी उमेदवाराच्या विरोधात मराठा उमेदवाराच्या बाजूने पक्षाचा उमेदवार म्हणून प्रामाणिकपणे काम तर केलेच शिवाय मतांचे विभाजन टाळून मतांची जोडणी करण्यात यशस्वी झाल्यामुळेच अशक्य असा विजय लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणजेच महाविकास आघाडीच्या पारड्यात मिळू शकला. यामध्ये निश्चितच ताईंचा खारीचा वाटा नक्कीच होता. त्याचबरोबर विद्यमान विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाने विद्यमान आमदाराला त्याची निष्ठा पाहून पुन्हा एकदा संधी द्यावी अन्यथा पक्ष उमेदवार बदलणार असेल तर माझ्यासारख्या पक्षातील ज्येष्ठ आणि कर्तुत्व पाहून महिला प्रतिनिधी म्हणून प्राधान्याने उमेदवारी द्यावी. अशी केलेली प्रामाणिक मागणी बीड विधानसभा मतदारसंघातच नव्हे तर राज्यात एक आदर्शवत चर्चेचा विषय ठरत आहे. ताईंनी बीड विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याचे जाहीर करून आपली इच्छाशक्ती प्रगट केल्याने मतदार संघातील लाडक्या महिला मतदारांमध्ये विशेषतः उत्साह संचारला आहे.

# ९५ लाखांची कर थकबाकी

## केडीएमसी कडून रोशन पेट्रोल पंपचे कार्यालय सील

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.१४, कल्याण (ठाणे) :** कल्याण-डोंबिवली महापालिकेने (केडीएमसी) ९५ लाख रुपयांची थकबाकी न भरल्यामुळे कल्याण पश्चिम पोर्णिमा चौका जवळील रोशन पेट्रोल पंपच्या कार्यालयावर कारवाई करत सील ठोकले. केडीएमसीकडून मालमत्ता कर वसुली मोहिमेला गती देण्यात आली असून थकबाकीदारांवर कठोर पावले उचलली जात आहेत.

महापालिकेच्या वतीने वारंवार नोटिसा देऊन ही कर थकबाकी न भरल्याने अखेर प्रशासनाने आज पंपच्या कार्यालयावर कारवाई केली. थकबाकीदारांकडून वेळेवर कर वसूल करण्यासाठी केडीएमसीने ही मोहीम तीव्र केली आहे.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रशासनाकडून अनेक वेळा कर भरण्याचे आवाहन करण्यात आले होते. मात्र वेळेत रक्कम न भरल्यामुळे पंपच्या कार्यालयाला सील करण्यात आले आहे. या पुढे थकबाकी न भरल्यास पेट्रोपंप ही सील करण्यात येतील. सदरची करवाई मुख्यालय व ब प्रभाग यांच्या संयुक्त पणे करण्यात आली कल्याण मुख्यालयाच्या कर विभागाच्या सहाय्यक आयुक्त कर्पे मॅडम तसेच सहाय्यक आयुक्त स्वाती देशमुख व अधीक्षक प्रमोद पाटील तसेच यांच्या उपस्थितीत ही करवाई करण्यात आली. केडीएमसीने इतर थकबाकीदारांना ही तातडीने थकबाकी भरण्याचे निर्देश दिले असून थकबाकी न भरल्यास अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

## समाजवादी नेत्या मृणालताई गोरे स्मृती उद्यान नागरिकांसाठी खुले

**अक्षराज : अजय पुजारी**

**दि.१४, दिंडोशी (मुं.उपनगर) :** दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ४० मधील नव्याने बांधण्यात आलेल्या ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणालताई गोरे स्मृती उद्यान सोमवार, दिणक १४ ऑक्टोबर रोजी नागरिकांसाठी खुले झाले. पाणीवाली बाई म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रसिद्ध समाजवादी नेत्या मृणालताई गोरे यांनी संघर्ष व अनेक आंदोलने करून येथे मध्यमवर्गीयांना निवारा मिळण्यासाठी सुमारे ६२ एकर जागेत नागरी निवारा वसाहत उभी केली.

त्यांच्या कार्याची आठवण म्हणून या ठिकाणी सुसज्ज उद्यान त्यांच्या नावाने उभारावे अशी मागणी येथील ११३ गृहनिर्माण सोसायट्यांनी आमदार सुनील प्रभू यांच्या कडे केली होती. या उद्यानाचा विकास लवकरात लवकर करून नागरिकांना खुले करून देण्याची ग्वाही आमदार सुनील प्रभू यांनी स्थानिक नागरिकांना दिली होती. तसेच मागील अनेक महिने काम पूर्ण करून घेण्यासाठी माजी उप महापौर सुहास वाडकर यांनी देखील पाठपुरावा केला.

या ठिकाणी सुमारे ३ हजार चौरस मीटर जागेत तब्बल साडेतीन कोटी एवढा सौंदर्यीकरण निधी वापरून या उद्यानाचा विकास करण्यात आला. खडक फोडून आणि टेबल स्पॉट उभारून येथील निसर्गरम्य उद्यानात नागरिकांसाठी योगाची सुविधा, लहान मुलांसाठी विविध खेळणी, फिटनेस फ्रिक तरुणांसाठी ओपन एअर जिम, जेष्ठ नागरिकांसाठी गजेबो (जेष्ठ नागरिक कट्टा), बैठक व्यवस्था (गार्डन बेंच), हिरवळ (लॉन), विविध प्रकारची झाडे, चिमुरड्यासाठी विविध खेळणी, भव्य प्रवेशद्वार, जॉगिंग ट्रॅक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खुले अँफी थिएटर, खुले समाज मंदिर अशा साधनांनी युक्त असे हे सुंदर रंगरंगोटी केलेले उद्यान येथील नागरिकांचे आधारवड ठरणार आहे. शिवसेना नेते आमदार सुनिल प्रभु यांच्या हस्ते हे उद्यान नागरिकांकरिता खुले करण्यात आले.